डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारविश्व

(गौरव ग्रंथ)

संपादक

प्रा. निवृत्ती रंगनाथ हुरगुळे

सह संपादक

प्रा. डॉ.बाळासाहेब क्षिरसागर

प्रा.डॉ. रामभाऊ भाकरे

ISBN: 978-93-83871-52-0

Dr. Babasaheb Ambedkaranche Vicharvishwa (Gaurav Granth)
Editied by N.R.Hurgule, Dr. B.S..Kshirsagar & Dr. Rambhau Bhakre

Typesetting
Seema Gangarde, Parbhani

Cover Designing
Dr. Kalyan Gangarde

© Editors

Printed and Published by

Dr. Kalyan Gangarde,
New Man Publication
108, Brahma Apartments,
Nr. Dattadham, Parbhani - 431401
Email: nmpublication@gmail.com
www.newmanpublication.com
Mob. 91 9420079975, +91 9730721393

Price- INR 295/-

Disclaimer: Articles in this book do not reflect the views or policies of the Editor or the Publisher. Respective authors are responsible for the originality of their views / opinions expressed in their articles / papers- **Editors/ Publisher**

अनुक्रमणिका

1. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारताचे परराष्ट्र धोरण /डॉ.सुखनंदन ढाले | ९
2. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे मुल्यांकन एक ऐतिहासिक अभ्यास / प्रा. डॉ. क्षिरसागर बि.एस. | १४
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि धर्मांतर / प्रा.प्रकाश जंगले | २०
4. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय लोकशाही संबंधी विचार / डॉ.राजेश्वर कीर्तनकार | २४
5. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थ्यांसाठी भाषण : एक अभ्यास / प्रा. डॉ. मुक्टे आर.डी. | २९
6. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या कृषीसंबंधी जलनिती व यांत्रिकीकरणाच्या भूमिकेची प्रांसगिकता / सिरसाट सुमेध शांताराम, डॉ. सावके बी. एस. | ३४
7. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार / प्रा.व्ही.बी.चांदजकर | ३८
8. डॉ . आबेंडकरांचे समाजशास्त्रीय विचार / प्रा. डि.एस. कांबळे | ४३
9. अस्पृश्यता उद्धारात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका / पाईकराव वर्षा मुकिंदराव | ४६
10. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार चळवळीतील योगदान /प्रा. डॉ. क्षिरसागर बी. एस. , प्रा.जी.एम. घुटे | ५०
11. जल व्यवस्थापन, विद्युत नियोजन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर / डॉ. पिपंळपल्ले आर.आर. | ५८
12. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषयक विचार / प्रा. डॉ. सुखदेव बलखंडे | ६४
13. स्त्री उध्दारकर्ते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर / दलित सुभाषराव कांबळे | ६८
14. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार / प्रा. राजुरकर बलवीरचंद्र बापूसाहेब | ७२
15. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण / प्रा.गुंजकर सोमनाथ लक्ष्मण | ७७
16. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार / जी. एस. कुबडे | ८१
17. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार व भारतीय अर्थव्यवस्था / वासनीकर श्यामराव लक्ष्मण | ८५
18. स्वतंत्र मजूर पक्षाचे शेतीविषयक कार्य / प्रा.डॉ. गाढे एस.बी. | ९०
19. समान नागरी कायदा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर/डॉ.चौकटे पी. पी.| ९७
20. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे आर्थिक विचार / प्रा. अशोक गंगाराम अंभोरे, प्रा. डॉ. क्षिरसागर बी.एस. | १०४
21. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक दृष्टिकोण / प्रा.संदिप चपटे | १०८

१६.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार

सहा. प्राध्यापक जी. एस. कुवडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, मातोश्री शांताबाई गोटे महा.वाशिम

प्रस्तावना :- लोकशाही वादी भारत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १२५ वी जयंती साजरी करण्यासाठी सज्ज आहे. या पार्श्वभूमीवर आधुनिक, लोकशाही व सामाजिकदृष्टया न्याय्य भारतासाठीच्या संघर्षातली आंबेडकरांची भूमीका अधिक उजळुन निघाली आहे स्वातंत्र्य चळवळीच्या महान लढयात आंबेडकरांना समकालीन असलेल्या आणि त्यांच्या विरोधात गेलेल्या इतर अनेक प्रभावशाली राष्ट्रीय नेत्यांच्या तुलनेत आंबेडकरांचे नेतृत्व आजच्या काळात अधिकच झळालेले दिसते. त्यांचे जीवन, संघर्ष, अभ्यास कल्पनेच्या बाबतीत प्रयोगशीलता या सर्वांमधून अधोरेखीत झालेले प्रश्न अजूनही कायम आहेत, धगधगते आहे.

भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे आपल्या देशातील महान व्यक्तीपैकी एक होते. अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी इतकी कुशाग्र व चिकित्सक बुध्दी असुनही डॉ. आंबेडकरांना इतर कार्याच्या व्यापामुळे ही बाजु विकसित करण्यास वेळ मिळाला नाही. भारतीय रूपयाचा प्रश्न हा प्रबंध १९२३ मध्ये प्रकाशित झाल्यावर दोन वर्षातच त्याच्या प्रती संपल्या. तरीपण नवीन आवृत्ती काढण्यास १९४७ साल उजाडले. या नव्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हटले आहे की - मी अर्थशास्त्राकडून विधी व राजकारण याकडे वळल्यामुळे मला हे काम लवकर हाती घेता आले नाही. या परिस्थितीमुळे त्यांचे अर्थशास्त्रीय विचार पुर्णपणे विकसीत होऊ शकले नाहीत. साहजिकच एक कायदेपंडित म्हणुन, घटनातज्ञ म्हणून किंवा समाज सुधारक म्हणून त्यांना जेवढे मानले गेले तेवढी मान्यता त्यांच्यामधील अर्थशास्त्रज्ञाला मिळाली नाही.

आर्थिक विचारामधील योगदान: डॉ. आंबेडकरांनी अनेक विषयाशी संबंधित मुद्यांचा उहापोह केला आहे. याशिवाय दलित -शोषितांच्या प्रश्नांना केंद्रीय मानून त्यांनी इतर आर्थिक विषयांवरही मते व्यक्त केली. अर्थात त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये समाज - सुधारणेचा पैलू इतका प्रबळ (आणि एका अर्थाने अपरिहार्य) होता की प्रत्येक विवेचनाला ही पार्श्वभूमी दिसुन येते. श्रमिकांचे प्रश्न असोत, शेतीच्या समस्या असोत, किंवा समाजवादाची चर्चा असो, दलित- शोषितांच्या संदर्भायिवाय त्यांची पुर्तता झालेली नाही. भारतीय अंदाजपत्रके आणि घटनेवरील भाषणे, इंडिपेडंट लेबर पार्टी आणि शेडयूल्ड कास्ट्स फेडरेशन यांचे जाहीरनामे यातुन प्रामुख्याने त्यांचे आर्थिक विचार व्यक्त झालेले दिसतात.

१) प्रादेशिक वित्त :- भारतामध्ये १८३३ पासुन वित्तीय व्यवस्थेचा विकास कसा होत गेला याचा शोध डॉ. आंबेडकरांनी घेतला आहे. ब्रिटिशांची वसाहतवादी रचना, नोकरशाही आणि देशातील प्रतिगामी तत्वे यांचा समाचार त्यांनी या भागात घेतला आहे. इंग्रजाच्या शासनामुळे भारतात झालेली प्रगती त्यांनी मान्य केली, परंतु सुख आणि शांती मिळते म्हणुन पारतंत्र्यात आनंदानी राहण्यास भारतीय लोक म्हणजे मुकी जनावरे नव्हेत याची जाणीवही दिली. इंग्लंडमधील उत्पादक आणि उद्योग यांचे हित विचारात घेऊनच भारताचे धोरण ठरले, व ही गोष्ट भारताच्या हाल अपेष्टाचे प्रमुख कारण आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रा. सेलिगमन म्हणतात - भारतातील प्रादेशिक वित्ताबाबतच्या वस्तुस्थितीचे चित्रण आणि त्यातील बदलांचे तटस्थ विश्लेषण हे आंबेडकरांचे विशेष योगदान आहे. यातील निष्कर्ष इतर देशांनाही लागु होऊ शकतात.वित्ताच्या प्रश्नाशी संबंधित तत्वाचे इतके तपशीलवार अध्ययन माझ्या पाहण्यात नाही.

२) रूपयाचा प्रश्न :- भारताचा रूपया आणि इंग्लंडचा पौंड यांच्या संबंधाचा महत्वपुर्ण प्रश्न या अभ्यासात समाविष्ट होता. आपली भुमिका ठामपणे मांडतांना डॉ. आंबेडकरांनी लॉर्ड केन्स यांच्या सारख्या अर्थशास्त्रावर सुध्दा टीका केली. त्यांच्या विवेचनानुसार, भारतीय सुवर्ण विनिमय प्रमापाच्या शास्त्रीय आधाराचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रो. केन्सशिवाय अन्य व्यक्तीनी केला नव्हता . परंतु केन्स आणि आंबेडकर याचे निष्कर्ष तात्र परस्पर जुळणारे नव्हते. विनिमय प्रमापाच्या समर्थनासाठी केन्स यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्याबाबत डॉ. आंबेडकरांना शंका होती. कारण केन्स यांनी आपल्या विश्लेषणात एका मुलभुत बाबीकडे दुर्लक्ष केले होते. ती म्हणजे जोपर्यंत रूपयाच्या सामान्य क्रयशक्तीत स्थिरता येत नाही तो पर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही. नेमकी हीच गोष्ट विनिमय प्रमापामुळे शक्य होत नव्हती. या पध्दतीने मुळ रोगाएवजी केवळ लक्षणांचाच उपाय होत होता. डॉ. आंबेडकरांचे मत तर असे होते की रोग वाढविण्याचे कार्य या पध्दतीनेच केले होते.

भारतीय शेतीचा प्रश्न : डॉ. आंबेडकरांच्या मते भारताच्या दृष्टीने शेती हा एक महान राष्ट्रीय उद्योग आहे. सर्व प्राथमिक व्यवसायामध्ये शेतीचे महत्व सर्वाधिक आहे. अशा या शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा एक महत्वपूर्ण घटक म्हणजे धारणक्षेत्राचा आकार हा होय.त्यांनी छोटया धारणक्षेत्रांच्या दुष्परिणामांचा उल्लेख केला आहे. भारताच्या बाबतीत दिसुन येणारी गंभीर परिस्थिती म्हणजे ही धारण क्षेत्रे छोटी तर आहेतच, शिवाय जोडून असण्याऐवजी विखुरलेली आहेत. म्हणजे हा प्रश्न केवळ उप-विभाजनाचा नसुन अपखंडनाचासुध्दा आहे.त्यांच्या मते छोटया धारणक्षेत्राचे एकत्रीकरण करून आकार वाढविल्यास शेतीची उत्पादकता वाढेल.

परंतु डॉ. आंबेडकरांनी केलेला विचार सखोल होता. प्रथमत : एकत्रीकरणाच्या संदर्भात त्यांनी बरोडा समितीच्या शिफारशी, प्रो. जेव्हन्सच्या सुचना आणि प्रो.कीर्टींगची मते यांचा परामर्श घेतला आहे. यापैकी प्रो. जेव्हन्स आणि बरोडा समितीने एकत्रीकरणाचा योग्य विचार केला, तर प्रो. कीर्टींग यांनी पुढील अपखंडन टाळण्यावर जास्त भर दिला असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांनी एक मुलगामी विचार मांडला आहे.त्यानुसार जमिनीचा आकार हे शब्द आर्थिकदृष्टया पाहिल्यास पोकळ आहेत. जमिनीचा एखादा तुकडा किफायतशीर आहे की अकिफायतशीर आहे ही गोष्ट त्याच्या आकारावर अवलंबुन नसुन तेथे इतर उत्पादन - घटकांचे प्रमाण कितपत योग्य आहे यावर अवलंबुन असते या अर्थाने विचार केल्यास मोठया धारणेक्षेत्राइतकीच छोटी धारणक्षेत्रेसुध्दा किफायतशीर ठरू शकतात. संबंधीत आकडेवारीच्या परीक्षणनंतर ते म्हणतात की सध्याची धारणक्षेत्रे निश्चितच अकिफायतशीर आकाराची आहेत. पण रूढ अर्थाने नव्हे (म्हणजे ती अतिशय छोटी आहेत म्हणुन नव्हे) , तर ती इतर संदर्भात मोठी आहेत म्हणुन अकिफायतशीर आहेत कारण त्यांच्या वर्तमान आकाराच्या तुलनेत उत्पादनाची इतर साधने अतिशय कमी पडत असल्याने हा मोठा आकार अकिफतशीर ठरतो. म्हणुन शेतीची उत्पादकता वाढविण्याचा खरा उपाय धारणक्षेत्राचा आकार वाढवुन स्वस्थ बसणे हा नाही, तर भांडवल व साधनांची उपलब्धता वाढविणे हा आहे. एक मौलिक विचार डॉ. आंबेडकर म्हणतात- छोटया धारण क्षेत्रांचे दुष्परिणाम ही भारतीय सामाजिक अर्थव्यवस्थेच्या विसंगतीची निष्पत्ती आहे. अतिरिक्त आणि कार्यविहीन पडलेला लोकसंख्योचा मोठा भाग शेतीवर ताण निर्माण करतो.. म्हणुन भारताच्या शेतीविषयक प्रश्नाचे खरे उत्तर या देशाच्या औद्योगीकरणातच आहे.

राज्य - समाजवादाची संकल्पना : डॉ. आंबेडकरांच्या लिखाणात राज्य-समाजवाद ही संकल्पना बरेचदा येते. समाजाची आर्थिक रचना कशी असावी याचे स्पष्टीकरण करताना ही कल्पना मांडलेली आहे. त्यांच्या मते, राज्य-समाजवादाचा समावेश घटनेतच करावा, व तो अंमलात आणण्यासाठी सांसदीय लोकशाही असावी. असे केले तरच हुकूमशाहीची शक्यता दुर होऊन लोकशाही टिकेल व समाजवादाची स्थापना होईल. परंतु हे स्वप्न साकार करण्यासाठी घटनेत केवळ राजकीय व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करणे पुरेसे नाही, तर आर्थिक रचनेचे स्वरूपही विशद करायला हवे. शास्त्रीय समाजवाद आणि निर्हस्तक्षेप नीती या दोन्ही टोकांचा त्यानी विरोध केला. मिश्र स्वरूपाची अर्थव्यवस्था हा त्यांच्या आर्थिक रचनेचा आधार होता. भांडवलशाही पध्दतीमुळे जी विषमता निर्माण झाली ती दुर करण्यासाठी क्रमा-क्रमाने परिवर्तन व्हायला हवे. त्यासाठी सांसदीय लोकशाही हा मार्ग होता , तर राज्य -

समाजवाद हे अंतिम रूप होते. परंतु तो साम्यवादी रचनेशी जुळणारा नसुन लोकशाहीची मुल्ये जोपासणारा आहे.

मुल्यमापन : डॉ. आंबेडकरांच्या जीवनात समाजसुधारक, कायदेपंडित , घटनातज्ञ या बाजुचे इतके प्राबल्य होते की अर्थशास्त्रज्ञ ही बाजु मागे पडली. राजकीय क र्यामधील व्यस्ततेचाही हा परिणाम होता, पण त्यामुळे आपण एक ा चांगल्या अर्थशास्त्रज्ञाला वंचित झालो हे मात्र खरे.अर्थशास्त्रीय विचारासाठी पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे त्यांनी जे विचार मांडले त्यात क ाही कमतरता अपरिहार्यपणे दिसुन येतात.मार्क्सवादाला नाकारणे हे त्यांचे प्रतिगामी पाऊल होते असे म्हटले जाते. त्यांनी स्वत:चा वर्गविषयक क ार्यक्रम दिला नाही. मार्क्सवादाला बौध्द तत्वज्ञानाचा पर्याय देऊन समाजवाद साध्य करण्याचा त्यांचा प्रयत्न अनाकलनीय ठरतो. भारतातील अस्पृश्यांचा प्रश्न हा वर्ग - युध्दाचा प्रश्न आहे अशी त्यांची भूमिका होती , पण जातीय रचनेपासुन विलग होण्यासाठी धर्मांतर करून त्यांनी वर्ग संघर्ष टाळला असे मत मांडले जाते.त्यांच्या आर्थिक विचारांना दलित - शोषितांच्या प्रश्नांची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे त्यांच्या विश्लेषणाला वास्तविकतेचा आधार प्राप्त होतो. रा ज्य - समाजवादाच्या संदर्भात त्यांनी शेतीच्या पुनर्रचनेवर मते व्यक्त केली, व त्यांचाही उद्देश लाखो शेतमजुरांची अवस्था सुधारणे हाच होता. परंतु यादृष्टीने प्रत्यक्षात फारशी उपाययोजना झाली नाही. कुळ कायद्यासारख्या उपायावर डॉ.आबेडकरांचा विश्वास नव्हता, पणू तेच उपाय आपण केले. हे कायदे यशस्वी होऊ शकले नाहीत ही गोष्ट १९७२ च्या अप्पु- समितीने अतिशय स्पष्टपणे दाखविली . या बाबतीत डॉ. आंबेडकरांची भूमिक ा योग्य ठरली. श्रमिक ांना, विशेषत: शेत- मजुरांना, विविध सोयी मिळाव्यात असा त्यांचा आग्रह होता. पण हे विचारसुध्दा अद्याप ख-या अर्थाने अंमलात आलेले नाहीत. त्यांचे उपाय निश्चितपणे असे आहेत जे प्रत्यक्षात आणून आपण ग्रामीण भागातील असंख्य शोषितांना चांगले जीवन जगण्याचा न्याय हक्क देऊ शकतो. शेतीच्या संदर्भात , विशेषता : छोटया धारणक्षेत्राबाबत, त्यांनी मांडलेले विचार आजही उपयुक्त ठरू शक तात.डॉ. आंबेडकरांनी जे विचार मांडले त्यांचे ऐतिहासिक महत्व मान्य करायला हवे. ब्रिटिश राजवटीच्या काळात आणि त्यांच्याच देशात संशोधन करून देशभक्तीचे दर्शन घडविणे, राज्यक र्त्याचे दोष परखडपणे मांडणे आणि त्यांची प्रशंसा मिळविणे ही कामगिरी असामान्य नाही असे कोणी म्हणणार नाही.

संदर्भ सूची :-

१) डॉ. विजय कविमंडन :- आर्थीक विचारांचा इतिहास
२) डॉ. भटनागर व बहादुर :- आर्थिक विचारांचा इतिहास
३) परिवर्तनाचा वाटसरू :- मासिक मार्च २०१६